**Q.P. Code :08636**

**(वेळ – ३ तास)** **गुण : १००**

**सूचनाः** १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. (प्रत्येकी २० गुण)

१. (अ) मानवी व मानवेतर संदेशनातील फरक स्पष्ट करून मानवी भाषेची लक्षणे सविस्तर सांगा.

**किंवा**

(ब) भाषाभ्यासाच्या विविध पद्धती सांगून ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.

२. (अ) 'भाषिक परिवर्तन' ही संकल्पना स्पष्ट करून ध्वनिपरिवर्तनाची कारणे सोदाहरण लिहा.

**किंवा**

(ब) अर्थपरिवर्तनाची व्याख्या सांगून अर्थपरिवर्तनाचे प्रकार साधार स्पष्ट करा.

३. (अ) शब्दजातीच्या पारंपरिक वर्गीकरणाची चर्चा करून 'नाम' व 'सर्वनाम' या शब्दजीतींची सविस्तर मांडणी करा.

**किंवा**

(ब) 'प्रयोग' ही संकल्पना स्पष्ट करून दामलेकृत संकीर्ण प्रयोगाची चिकित्सा करा.

४. (अ) विभक्ती प्रत्ययावरून मानाव्यात की अर्थावरून मानाव्यात यासंदर्भातील मतमतांतराचा सोदाहरण आढावा घ्या.

**किंवा**

(ब) शब्दसिद्धीचे प्रकार सांगून 'उपसर्गघटित' व 'प्रत्ययघटित' शब्दांची चर्चा करा.

५. (अ) खालीलपैकी **कोणत्याही दोहोंवर** टिपा लिहा.
१. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच्या मर्यादा
२. अर्थपरिवर्तनाची कोणतीही दोन कारणे
३. खंडाधिष्ठित स्वनिम
४. आशयसूचक व कार्यसूचक रूपिम

(ब) खालीलपैकी **कोणत्याही दोहोंवर** टिपा लिहा.
१. शब्दयोगी अव्यय
२. चरमप्रत्यय
३. कर्तरीप्रयोग
४. द्विगू समास

-----------------

822C27AFC1FCADEAA4D1E94559B2E26A